# जाहीर नोटीस

**वाचा** १.शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण ०३ /२०१५/प्र.क्र२४/अ-२दि.१२/०५/२०१५
२.महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्यूएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२ मंत्रालय मुंबई-४०००० ३२ दिनांक - २५/०१/२०१७

क्र.एलएक्यू/खा.वा.४७९/कोल्हापूर/भूसंविअ-११को/ दिनांक 02 NOV 2023

ज्या अर्थी, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी शहर कोल्हापूर बी वॉर्ड, सि. स. नं. १८७ ख या मिळकतीवरील श्री. करवीर निवासीनी मंदीराकडे घाटी दरवाजातील पश्चिम बाजूस असलेल्या या जागेमध्ये मणिकर्णीका कुंड खुला करुन मूळ स्वरुपात आणणेकामी आवश्यक असलेले शेजारच्या माऊली अपार्टमेंटचे भूसंपादन करणे कामी, गाळयाचे मूल्यांकन करणे कामी भूसंपादन या प्रयोजनाकरिता वरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतुदी अंतर्गत कार्यपध्दतीव्दारे खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. / देव वशि. जा २००८/२०२२, दिनांक ०१/११/२०२२ नुसार विषयांकित प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सादर केला आहे.

ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र./कार्या/११/ भूसं/ आरआर /९८७/२०२२ दिनांक २५/११/२०२२ अन्वये उक्त प्रस्तावा संबंधीवरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय तसेच शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र. ११, कोल्हापूर तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, कोल्हापूर याव्दारे, प्रस्तावित खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

प्रकल्पासाठी जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणे कामी जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी गठित जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम२६ ते ३० च्या तरतुदींनुसार तसेच सदर अधिनियमाच्या शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के पर्यंत रक्कम वाढीव देऊन खरेदीची रक्कम निश्चित करण्यात येईल. यास्तव

१. हितसंबंधित मिळकत धारकांनी, मिळकतीच्या मालकी हिस्सेवर इतर कोणतेही खाजगी व सरकारी वित्त संस्था, व्यक्ती, कंपनी यांचा हक्क, हितसंबध, हक्क, बक्षिस, दत्तक, वारसाहक्क, दान, गहाण, बोजा, बाकी लिन, कर्ज, जप्ती, करारमदार व इतर कोणतेही हक्क, तसेच कोणत्याही दिवाणी अथवा अन्य न्यायालयाचा स्थगिती, मनाई आदेश असल्यास याबाबतच्या हरकती / संमती देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे सि. स. नं. २४०२ "ए" वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजीपेठ, कोल्हापूर (फोन नं. ०२३१-२६२६१४७) येथील कार्यालयाकडेही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सर्व कागदपत्रांसह दाखल कराव्यात.

देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने एलएक्यू/ खाजगी वाटाघाटी/४७९, शहर कोल्हापूर बी वॉर्ड, सि.स.नं. १८७ ख या मिळकतीवरील श्री. करवीर निवासीनी मंदीराकडे घाटी दरवाजातीलपश्चिम बाजूस असलेल्या या जागेमध्ये मणिकर्णीका कुंड खुला करून मूळ स्वरुपात आणणे कामी आवश्यक असलेले शेजारच्या माऊली अपार्टमेंटचे भूसंपादन करणेकामी,गाळयाचे मूल्यांकन करणे कामी भूसंपादनाचे कामाकरिता खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीपध्दतीने खरेदी करावयाच्या खाजगी मिळकतीचा तपशिल

## मिळकतीचे वर्णन

तुकडी व जि. कोल्हापूर, पोट तुकडी तहसिल करवीर कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील बी वॉर्ड येथील सि.स.नं. १९२अ यांचे क्षेत्र ६१.९० चौ.मी., सि.स.नं. १९५ अ याचे क्षेत्र १०.१० चौ.मी. व सि.स.नं. १९६ यांचे क्षेत्र ५६

चौ.मी. या क्षेत्रापैकी २८.०० चौ. मी. या मिळकतींचे एकुण एकत्रित असलेले क्षेत्र १०० चौ. मी. क्षेत्रावर बांधलेली "माऊली अपार्टमेंट" या बहुमजली इमारती मधील सर्व युनिट्स सह संपूर्ण इमारत यासी चतु:सिमा

पूर्वेस - सि.स.नं. १८७ ख ची मिळकत
पश्चिमेस - कनकेश्वर कॉम्प्लेक्स
दक्षिणेस - सि.स.नं. १९२ ब ची खुली जागा
उत्तरेस - रस्ता

| अ. क्र. | मजला | युनिट नं. | चतु:सीमा | क्षेत्र चौ. मीटर. | मालमत्ता प्रत्रकातील नोंदीनुसार हितसंबंधींची नावे ज्यांना मालमत्तेचा मोबदला देणे नियोजित आहे |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेसमेंन्ट | जी -१ | पूर्व - जीना<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - गोडाऊन नं. जी २<br>उत्तर - जोतिबा रोड | १८.०० | श्री. प्रफुल्ल पांडुरंग नागवेकर |
| २ | | जी - २ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - गोडाऊन नं. जी ३<br>उत्तर - गोडाऊन नं. जी १ | ७.९० | श्रीमती. सुचिता राजनकडोलकर, प्रज्ञा राजनकडोलकर व प्रसादराजनकडोलकर |
| ३ | | जी - ३ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - गोडाऊन नं. जी ४<br>उत्तर - गोडाऊन नं. जी २ | ९.२९ | मालमत्ता पत्रकी मालकी बाबत नोंददिसून येत नसलेमुळेमूळजागा मालकसौ. रुपाली रमेश आंबार्डेकर व इतर |
| ४ | | जी - ४ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - गोडाऊन नं. जी ५<br>उत्तर - गोडाऊन नं. जी ३ | ९.२९ | मालमत्ता पत्रकी मालकी बाबत नोंद दिसून येत नसलेमुळे मूळ जागा मालकसौ. रुपाली रमेश आंबार्डेकर व इतर |
| ५ | | जी - ५ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - गोडाऊन नं. जी ६<br>उत्तर - गोडाऊन नं. जी ४ | ९.२९ | मालमत्ता पत्रकी मालकी बाबत नोंद दिसून येत नसलेमुळे मूळ जागा मालकसौ. रुपाली रमेश आंबार्डेकर व इतर |
| ६ | | जी - ६ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - सि.स.नं १९२ ब<br>उत्तर - गोडाऊन नं. जी ५ | १८.५८ | श्री. सुरेश बाबुराव जाधव |
| ७ | तळ मजला | एस - १ | पूर्व- जीना व पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - दुकानगाळा नं. एस २<br>उत्तर - जोतिबा रोड | १४.८७ | श्री. अजित रत्नाकरकारेकर |
| ८ | | एस -२ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - दुकानगाळा नं. एस ३<br>उत्तर - दुकानगाळा नं. एस १ | ९.२९ | शमिमबाणु खुदाबक्ष कागदी आफताफ खुदाबक्ष कागदी |
| ९ | | एस - ३ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - दुकानगाळा नं. एस ४<br>उत्तर - दुकानगाळा नं. एस २ | ९.२९ | श्री. कमलेश अशोक डोंगरे |
| १० | | एस - ४ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - दुकानगाळा नं. एस ५<br>उत्तर - दुकानगाळा नं. एस ३ | ९.२९ | श्री. कमलेश अशोक डोंगरे व श्री अभिजीत दामोदर भुर्के |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | | एस - ५ | पूर्व- पॅसेज<br>पश्चिम - कणकेश्वर कॉम्लेक्स<br>दक्षिण - सि. स. नं. १९२ ब<br>उत्तर - दुकानगाळा नं. एस ४ | ९.२९ | श्री अभिजीत दामोदर भुर्के |
| १२ | पहिला मजला | एल - १ | संपूर्ण मजल्यावर अॅटॅच टॉयलेट चार रुम | ८८.३८ | मालमत्ता पत्रकी मालकी बाबत नोंद दिसून येत नसलेमुळे मूळ जागा मालकसौ. रुपाली रमेश आंबार्डेकर व इतर |
| १३ | दुसरा मजला | एल - २ | संपूर्ण मजल्यावर ३ जनरल रुम व २ कॉमन टॉयलेट | ५९.६१ | मालमत्ता पत्रकी मालकी बाबत नोंद दिसून येत नसलेमुळे मूळ जागा मालकसौ. रुपाली रमेश आंबार्डेकर व इतर |

ठिकाण - कोल्हापूर
दिनांक - 02 NOV 2023

अॅड धिरज पिसाळ
संपादन मंडळाचे पॅनेल
वरील वकील

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

भूमि संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

प्रशासक
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत -

१) जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
२) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) जिल्हा परिषद, कोल्हापूरयांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
४) उपविभागिय अधिकारी, करवीर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
५) तहसिलदार, करवीर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
६) नगरभूमापन अधिकारी, करवीर कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
७) गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
८) वॉर्ड ऑफिसर, बी वॉर्ड, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
९) मंडळ अधिकारी करवीर ता. करवीर जि. कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
१०) गावकामगार तलाठी करवीर ता. करवीर जि. कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
११) सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी व माहितीसाठी